**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००४१७-२०१२**

**नियमित दिवाणी दावा क्र. ११४/२०१२**

**निशाणी क्र.२३४ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी क्र.१(४) यांनी प्रतिवादी क्र.१८ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस दाव्यात सामील करुन घेण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी क्र.१(४) यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१८ हा दि.१९/०२/२०२५ रोजी मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१८ चे वारसांबाबत माहिती घेवून त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करण्यास विलंब झाला. त्यामुळे प्रतिवादी क्र.१८ चे कायदेशीर प्रतिनीधी मुदतीत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. सदर मयत प्रतिवादी क्र.१८ चे वारस मयत दिनांकापासून ९० दिवसांमध्ये रेकॉर्डवर येणे गरजेचे होते. सदर प्रतिवादी क्र.१८ चे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यात समाविष्ठ केले जाणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे न झाल्यास वादीच्या न्यायहक्कांवर बाध येवून त्याचे कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणारे आहे. सदर प्रतिवादीबाबत अबेटमेंट ऑर्डर रद्दबातल होणेस ७० दिवसांचा इतका विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून झालेला नसून तो केवळ वर नमूद कारणामुळेच झालेला आहे. सदरचा विलंब माफ झाल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब, प्रतिवादी क्र.१८ वारस दाव्यात दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी सरस निरस वाटप होवुन त्याचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.२४३/१ येथे प्रतिवादी क्र.१८ तुकाराम नारायण धुवाळी यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज नि.क्र.२३४ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस खर्चाची रक्कम रुपये ३००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.१८ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.24 16:40:38 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः २४/०९/२०२५